**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**

**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४**

क्र.कोविमं/शाखा/१२वी गोप./ 5226

कोल्हापूर ४१६ ००४,

दिनांक ०८.१०.२०२०

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,

सर्व मान्यताप्राप्त शाळा/क.महाविद्यालये,

सातारा,सांगली,कोल्हापूर

विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)परीक्षा बहुसंची(A,B,C, D चार संच)प्रश्नपत्रिकाबाबत..

संदर्भ:-राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/४२३०,दिनांक ०६.१०.२०२०

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुलक्षून आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी)परीक्षा इंग्रजी विषयासाठी बहुसंची(A,B,C, D चार संच)प्रश्नपत्रिका योजना ऑक्टोबर २००४च्या परीक्षेपासून सुरु करण्यात आलेली होती.

पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून उच्च माध्यमिक स्तरावरील अनुक्रमे इ.अकरावी व बारावीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची निर्मिती आणि त्याआधारे नविन पाठ्यपुस्तकांची निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परीषद,पुणे व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळामार्फत करण्यात आलेली आहे. त्यानुसार इ.१२वी साठी पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून करण्यात आलेली असून सदर नविन अभ्यासक्रमाची इ.१२ वीची प्रथम परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२१ मध्ये घेण्यात येणार आहे.

पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार इ.१२ वी भाषा विषयासाठी कृतीपत्रिका/प्रश्नपत्रिकांची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे इ.१२ वी साठी इंग्रजी विषयासाठी बहुसंची प्रश्नपत्रिका (A,B,C,D चार संच)योजनेत बदल करुन फेब्रुवारी/मार्च २०२१ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२वी) परीक्षेपासून पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यासाठी बहुसंची प्रश्नपत्रिकांऐवजी इंग्रजी या विषयासाठी एकच प्रश्नपत्रिका पुरविण्याबाबत व त्यानुसार बहुसंची प्रश्नपत्रिकाबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | परीक्षा | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा पुनर्रचित अभ्यासक्रम (इ.१२वी)( New Course) | मार्च २०२१ च्या इ.१२वी परीक्षेपासून पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यासाठी इंग्रजी या विषयासाठी बहुसंची प्रश्नपत्रिका ऐवजी एकच प्रश्नपत्रिका असावी. |
| २. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) (पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यासाठी)( Repeater Candidate ) | पुरवणी परीक्षा सन २०२०-२१ व मार्च २०२१ च्या इ.१२वी परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यासाठी इंग्रजी यां विषयासाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे A,B,C,D अशा चार संचात प्रश्नपत्रिका असावी. |

तरी वरीलप्रमाणे बहुसंची प्रश्नपत्रिका योजनेसंदर्भात बदलेल्या कार्यपध्दतीबाबत फेब्रुवारी/मार्च २०२१ च्या इ.१२वी परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना , पालकांना तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षक व अन्य संबधित घटकांना आपल्या स्तरावरुन योग्य त्या सुचना देण्यात याव्यात.

विभागीय सचिव,

कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर